**ठळक बातम्या**

- आगामी वर्षात देश नव्या आशा आणि संकल्पांसह पुढे जाण्यासाठी सज्ज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या युतीची घोषणा

- अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवर पर्यावरण तज्ज्ञांच्या आक्षेपाची सर्वोच्च न्यायालयाकडून दखल, उद्या सुनावणी होणार

**आणि**

- तुळजापूरमधे तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी नवरात्रौत्सवाला सुरुवात

**<><><><><>**

२०२५ या सरत्या वर्षानं भारताला मोठा आत्मविश्वास दिला असून, आता देश २०२६ मध्ये नवी आशा आणि नव्या संकल्पांसह पुढे जाण्यासाठी सज्ज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधत होते. हा या कार्यक्रमाचा १२९ वा भाग होता. २०२५ या वर्षाने प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला लावणारे क्षण दिल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. देशाच्या सुरक्षेपासून खेळांच्या मैदानापर्यंत आणि विज्ञानाच्या प्रयोगशाळांपासून ते जगभरातील मोठ्या व्यासपीठांपर्यंत भारताने प्रत्येक ठिकाणी आपला मजबूत ठसा उमटवला असं ते म्हणाले. सरत्या वर्षातलं ऑपरेशन सिंदूर प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचं प्रतीक बनलं असून, आजचा भारत आपल्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड करत नाही, हे जगानं पाहिल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

देशातल्या युवा शक्तीमुळे जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट YUVA SHAKTI**

विज्ञान क्षेत्रातली आपली कामगिरी, नाविन्यपूर्ण संशोधन, तंत्रज्ञानाचा विस्तार यामुळे जगभरातले देश खूप प्रभावित झाले असल्याचं ते म्हणाले. जगभरातली भारतीय युवा पिढी आपली संस्कृती आणि वारसा, याच्याशी घट्ट जोडलेली असावी, आपली संस्कृती आणि वारशाचं जतन संवर्धन करावं यासाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहितीही प्रधानमंत्र्यांनी दिली. देशाच्या स्वातंत्र्यात योगदान देणाऱ्या अज्ञात व्यक्तीमत्वांबद्दल समजून घेण्यासाठी सरकारनं तयार केलेल्या विशेष संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

आपल्या पारंपरिक कला या समाजाच्या सक्षमीकरणासह, लोकांच्या आर्थिक प्रगतीचं मोठं माध्यम बनल्याचं सांगून, त्यांनी याबाबत देशभरात सुरु असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती दिली.

२०२५ मधला हा 'मन की बात' चा शेवटचा भाग असल्याचं नमूद करून, २०२६ हे वर्ष 'विकसित भारत' या संकल्पाच्या पूर्ततेच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा ठरो, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आज कर्नाटकातल्या कारवारमधल्या कदंब नौदलतळाला भेट दिली. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी त्यांचं स्वागत केलं. नौदलतळाला भेट दिल्यानंतर राष्ट्रपतींनी आएनएस वाघशील पाणबुडीतून प्रवास केला. नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी त्यांच्यासोबत होते. पाणबुडीतून प्रवास करणाऱ्या त्या माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्यानंतरच्या दुसऱ्या राष्ट्रपती आहेत.

राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर चोख बंदोबस्त ठेवला असून अठरा किलोमीटर परिसरात मासेमारी बंद करण्यात आली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत सुरू असलेल्या मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेचा आज समारोप होत आहे. राज्य आणि केंद्र भागीदारी मजबूत करणं हे याचं उद्दिष्ट आहे. या परिषदेत सहा विशेष सत्रं आयोजित करण्यात आली. यानुसार राज्यांमधील नियमनमुक्ती, प्रशासनातील तंत्रज्ञान - संधी, धोके आणि निवारण, स्मार्ट पुरवठा साखळी आणि बाजारपेठ जोडणीसाठी ॲग्रीस्टॅक, एक राज्य, एक जागतिक दर्जाचं पर्यटन स्थळ, आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी या मुद्द्यांवर भविष्यातली धोरणं निश्चित करण्यावर चर्चा झाली. या परिषदेत सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, वरिष्ठ अधिकारी आणि क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले आहेत.

<><><><><>

मध्य प्रदेशातल्या जबलपूर इथल्या महाराष्ट्र शिक्षण मंडळ या संस्थेच्या शताब्दी सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आज सहभागी झाले. शिक्षण आणि संस्कृती हे दोन विषय मराठी माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय आहेत असं ते यावेळी म्हणाले. ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वासाठी प्रार्थना केली, या संस्थेच्या स्थापनेतही अशाच वैश्विक विचाराचं स्वरुप दिसून येतं असं ते म्हणाले. मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव आभासी पद्धतीनं या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

<><><><><>

काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीनं मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी आघाडीची घोषणा केली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित आघाडीचे नेते धैर्यवर्धन पुंडकर यांनी आज संयुक्त पत्रकार

परिषदेत या आघाडीची घोषणा केली. या आघाडीअंतर्गत मुंबईतल्या २२७ जागांपैकी ६२ जागा वंचित बहुजन आघाडी लढवणार आहे.
संविधानाला अभिप्रेत भारत घडवणं हाच दोन्ही पक्षांचा राजकीय अजेंडा असल्यानं दोन्ही पक्षांतली मैत्री नैसर्गिक स्वरूपाची असल्याचं हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं. राज्यातील अन्य २८ महापालिकांसाठीही आघाडीची चर्चा सुरू असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

देशाला आज काँग्रेस विचाराची गरज असल्याचं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या १४० व्या स्थापना दिनानिमित्त आज मुंबईत टिळक भवन इथल्या पक्ष कार्यालयात झालेल्या कार्यक्रर्मात ते बोलत होते.

देशात आज जात, धर्म, भाषा आणि पंथावरून समाजा समाजात विभाजन केलं जात असून, सत्ताधारी सामाजिक सलोखा बिघडवण्याचं काम करत असल्याची टीका त्यांनी केली. अशा परिस्थितीत काँग्रेसचा विचारच देशाला तारणारा विचार असल्याचं ते म्हणाले. मनरेगातील महात्मा गांधीं यांचं नाव कायम ठेवण्यासाठी आणि कामगारांच्या हक्कासाठी काँग्रेस वचनबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं, तसंच कार्यकर्त्यांना मनरेगा बचावची शपथही दिली गेली.

**<><><><><>**

अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयानं दखल घेतली असून, सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि ए.जी. मसीह यांचा समावेश असलेल्या सुट्टी-कालीन पिठासमोर उद्या या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. अरावली पर्वतरांगांच्या नव्या व्याख्येवर मोठ्या प्रमाणात निषेध आणि आक्षेप नोंदवला गेल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयानं हा हस्तक्षेप केला.

नुकत्याच स्वीकारण्यात आलेल्या नव्या व्याख्येनुसार, अरावली टेकड्यांमध्ये समुद्रसपाटीपासून कमीतकमी १०० मीटर आणि त्यापेक्षा जास्त उंची असलेला आणि त्याला जोडणारा उतार असलेला भूप्रदेश समाविष्ट करण्यात आला आहे. पर्यावरण संस्था आणि सामाजिक संघटनांनी या व्याख्येवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

**<><><><><>**

देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी पूर्ण पीठ असलेल्या तुळजापूरच्या तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी नवरात्रौत्सवाची सुरुवात आज दुपारी घटस्थापनेने झाली. तत्पूर्वी आज पहाटे देवीची मंचकी निद्रा संपून तिची सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. येत्या बुधवारी जलकुंभ यात्रेला सकाळी सात वाजता सुरुवात होईल. त्यानंतर शतचंडी होम, पूर्णाहूती, अन्नदान महाप्रसाद असे कार्यक्रम होणार आहेत. या महोत्सवासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यासह आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणातले लाखो भाविक तुळजापुरात दाखल होत आहेत.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात नायगाव इथे क्षुल्लक कारणावरून बार मालकाची बेदम मारहाण करून हत्या करण्यात आली. हत्येनंतर पळून जाताना हल्लेखोरांनी बारमधली रोख रक्कमही लंपास केली.

**<><><><><>**

पुणे-बंगळुरू महामार्गावर कनेरवाडी इथं शनिवारी पहाटे सीबीआयनं केलेल्या कारवाईत, अंबरग्रीस, म्हणजेच व्हेल माशाच्या उलटीची तस्करी केल्या प्रकरणी ३ जणांना अटक केली. जप्त करण्यात आलेल्या ‘अंबरग्रीस’ची किंमत अंदाजे सव्वा पाच कोटी रुपये होती अशी माहिती संबंधित सूत्रांनी दिली.

**<><><><><>**

बंदी घालण्यात आलेल्या गुटखा-युक्त उत्पादनांचा साठा आणि विक्री केल्या प्रकरणी पालघर जिल्हा पोलिसांनी २५ डिसेंबर रोजी केलेल्या कारवाईत एका दुकानदाराला अटक केली. या कारवाईत ६ लाख ३९ हजार रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला.

<><><><><>

मुंबईत सांताक्रूझमध्ये कलिना इथल्या एका इमारतीतल्या कार्यालयात आज पहाटे लागलेल्या आगीत विजेच्या वायर, कागदपत्र, लाकडी सामान, संगणक आणि इतर सामानाचं नुकसान झालं. या आगीत कोणतीही जीवित हानी झाल्याचं वृत्त नाही.

<><><><><>

रायगड जिल्ह्यात नवीन पनवेल भागात आज सकाळी एका डंपरने शाळेची बस आणि रिक्षाला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात बसमधली काही मुलं जखमी झाली. अपघातानंतर बसचे दरवाजे लॉक झाले होते. त्यामुळे पोलिसांनी काचा फोडून मुलांना सुरक्षितपणे बाहेर काढल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

<><><><><>

भंडारा जिल्हा पुरवठा विभागानं घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्याच्याकडचे ८ गॅस सिलिंडर जप्त केले आहेत.

<><><><><>

राज्यपालांच्या लोकभवनाच्या वतीनं सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे इथं आयोजित करण्यात आलेल्या डॉ. पी. सी. अलेक्झांडर राज्यस्तरीय आंतरविद्यापीठिय उत्स्फूर्त मराठी वक्तृत्व स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या अभय आळशीनं काल प्रथम क्रमांक पटकावला.

//<><><><><>//